# दि. ११/०८/२००९ रोजी मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा सल्लागार समिती सभेचे इतिवृत्त.

---

सर्व सदस्यांचे मा.अध्यक्षांच्या वतीने सदस्य सचिव यांनी हार्दिक स्वागत केले. यापुर्वी दि.१४/०७/२००९ रोजी संपन्न झालेल्या , जिल्हा सल्लगार समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्यांना पाठविण्यात आलेले असल्याची माहिती सदस्य सचिवांनी सभगृहास दिली व मंजुरीपुर्वी कोणाची सूचना असल्यास व्यक्त करण्याची विनंती केली. कोणाची सूचना नसल्याने सर्वानुमते इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.

१. सन २००९-१० या आर्थिक वर्षातील माहे जुलै-०९ अखेर उद्दिष्टे व साध्य बाबतची जिल्हा उद्योग केंद्राने केलेल्या प्रगतीची माहिती सर्व योजनानिहाय वाचुन दाखविण्यात आली. बी डी एस प्रणाली अंतर्गत कालमर्यादेनिहाय भौतिक व आर्थिक उद्दिष्ट पुर्ती करणे करीता नियोजन करण्यात आले आहे. पी एम ई जी पी योजनेंतर्गत अग्रणी बँक अधिकारी यांनी हया आर्थिक वर्षात उद्दिष्ट पुर्ती करीता आत्तापासूनच नियोजन करावे. तसेच पीएमईजीपी कार्यक्रमांतर्गत मागील वर्षातील मंजूर कर्ज प्रकरणांमध्ये कर्ज वाटप करण्याची मुदत ही दि. ३०-६-०९ होती त्यात शासनाने वाढ केली असून ही मुदतवाढ दि. ३१-८-०९ पर्यंत करण्यात आली आहे. तरी मागील वर्षातील (२००८-०९) ज्या कर्ज मंजुर प्रकरणांत बँकां मार्फत आज अखेर कर्ज वाटप झालेले नाहीत त्या सर्व बँकांनी दि. ३१-८-०९ पुर्वी कर्ज वाटप करुन मार्जिन मनी चा प्रस्ताव त्यांच्या नोडल बँकेकडे त्वरीत सादर करुन त्याची प्रत जिउकेंस पाठवावी. मागील वर्षातील एकुण मंजूर कर्ज प्रकरणां पैकी ४० कर्ज प्रकरणात आज अखेर बँकांनी कर्ज वाटप केलेले नाही अशा सर्व बँकांना जिउकें ने अग्रणी बँक अधिकारी, सीबीआय यांचे सहिने संयुक्तपणे सविस्तर पत्र पाठविल्या प्रमाणे संबंधीत बँकांनी त्वरीत कार्यवाही करावी व त्वरीत कर्ज वितरण करावे असे मा. अध्यक्षांनी सूचना केल्या. **(कार्यवाही : जिअबॅ व संबंधीत बँकां)**

२. जिल्हा पुरस्कार २००९ करीता सर्व औद्योगिक संघटना व उद्योजकांना आवाहन करुन जास्तीत जास्त अर्ज सादर करणे बाबत विनंती करण्यात आली. म्हणजे विहीत वेळेत कार्यवाही करता येईल. याबाबत वर्तमान पत्रांतुन सविस्तर बातमी देण्यात आली आहे.

शेवटी उपस्थितांचे आभार व्यक्त करुन सदस्य सचिवांनी मा.अध्यक्षांच्या अनुमतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरी/-----------

प्र.महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा सल्लागार समिती,
जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर

स्वाक्षरी/-----------
अतिरिक्त जिल्हाधिकारी ,अहमदनगर.

# दि. ११/०८/२००९ रोजी मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पांचव्या स्थानिक लोकांना रोजगार समिती सभेचे इतिवृत्त.

---

दि. १४/०७/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थानिक लोकांना रोजगार समिती सभेचे इतिवृत्त सभगृहास वाचून दाखविण्यांत येवून त्यावर चर्चा करण्यांत आली व सदरचे इतिवृत्तास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

प्र.महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, यांनी सदरचे विषयाबाबत पांचवी सभा असल्याचे सांगुन शासन निर्णय पत्र क्र.स्थालोरो-२००८/प्रक्र९३/उद्योग-६,दिनांक १७/११/२००८च्या शासन निर्णयातील तरतुदीची माहीती सभेस दिली. मा.विकास आयुक्त (उद्योग) यांचे दिनांक ३१/३/२००९ रोजीचे अर्धशासकीय पत्र त्यामधील सुचना तसेच राज्यस्तरीय समितीच्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्तानुसार कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या. सदस्य सचिव हयांनी असेही विषद केले की, विकास आयुक्त (उद्योग) यांचे सुचनेनुसार जिल्हापातळी वरील अधिका-यांची बैठकही घेण्यात आली होती. त्यामधील झालेल्या चर्चेची माहिती अवगत केली असता संबंधितांनी कार्यवाही करावी अशी सुचना मा.अध्यक्ष यांनी केली. त्याच बरोबर उद्योगामध्ये स्थानिक नोक-यांमध्ये पर्यवेक्षीय श्रेणीत ५० टक्के तर इतर श्रेणीत ८० टक्के प्रमाण ठेवण्याचे आवाहन केले व तसेच उपस्थित औद्योगिक संघटनांना ही माहिती सर्व उद्योगांना अवगत करणे संबंधी आवाहन करण्यात आले. तसेच प्रत्येक स्थापित उद्योग घटकाने अद्यावत ईएलपी-१ चे नमुना व प्रस्तावित उद्योग घटकाने ईएलपी-२ चा नमुना भरुन जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास वेळोवेळी सादर करावा. यावर मा. अध्यक्षांनी पर्यवेक्षीय सेवेतील ५० टक्के व इतर श्रेणीतील ८० टक्के प्रमाण हे उद्योगामध्ये स्थानिक लोकांना नोक-या देण्यामध्ये जिल्हयास साध्य असल्यामुळे जिल्हयात स्थानिक लोकांना रोजगार मिळण्यामध्ये तशी समस्या नाही असे स्पष्ट केले.

शेवटी काही अडचणी असल्यास जिल्हा उद्योग केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन करुन उपस्थितांचे आभार व्यक्त केले व सदस्य सचिवांनी मा.अध्यक्षांच्या अनुमतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरी/-----------
प्र.महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा स्थानिक लोकांना रोजगार समिती
जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर

स्वाक्षरी/-----------
अतिरिक्त जिल्हाधिकारी, अहमदनगर.

# दि. ११/०८/२००९ रोजी मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा आजारी उद्योग घटक पुनर्वसन समिती सभेचे इतिवृत्त.

---

दि. १४/०७/२००९ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा आजारी उद्योग घटक पुनर्वसन समिती सभेचे इतिवृत्त सभगृहास वाचून दाखविण्यांत येवून त्यावर चर्चा करण्यांत आली व सदरचे इतिवृत्तास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव यांनी दि.१०/०८/२००९ रोजी घेण्यात आलेल्या जिल्हा आजारी उद्योग पुर्नवसन उप समिती बाबत सविस्तर चर्चा करुन स्पष्ट केले की, आजारी उद्योगा संदर्भात मे. स्वस्तीक ॲटो प्रॉडक्टस, केडगांव, अहमदनगर तसेच मे. स्वस्तिक ॲक्सेसरीज प्रा.लि., केडगांव, अहमदनगर यांनी बॅंकेस पर्तता कागदपत्रे सादर करुन प्रत जिल्हा उद्योग केंद्रास दिली आहे. तसेच मे. आरटीके इंजिनिअरींग वर्क्स, केडगांव, अहमदनगर यांनी या कार्यालयाकडे आजारी उद्योग म्हणुन घोषित करण्याकरीता विहीत नमुन्यातील Annexure – D नगर को.ऑ. बॅंक लि., अहमदनगर शाखा यांचेकडुन सादर केले आहे. दि.१४/७/२००९ च्या सभेत बॅंक व उद्योजक यांचेसमवेत चर्चा करण्यात येऊन रिझर्व बॅंक ऑफ इंडीयाच्या मार्गदर्शन तत्वानुसार उद्योग घटकास कोणत्या तारखेपासुन संबंधीत बॅंकेने सवलतीच्या दराने व्याज आकारणी करावी याची माहिती आर बी आय कडुन मागविण्यात आली होती. तरी संबंधीत माहिती प्राप्त झाली असल्यास त्याची प्रत बॅंकेने सभेत सादर करावी अशी चर्चा झाली असता बॅंकेचे व्यवस्थापक यांना सभेत हजर रहाणे बाबत कळवून सुध्दा ते सभेस हजर राहीले नाहीत त्यामुळे संबंधीत मुद्याची माहिती सभेस मिळु न शकल्यामुळे मा. अध्यक्षांनी याबाबत नाराजी व्यड़तकरुन पुढील सभेत सर्व सविस्तर माहितीसह बॅंकेला उपस्थित रहाणचे कळविण्यात यावे असे आदेश मा. अध्यक्षांनी दिले.

तसेच मे. आर टी के इंजिनिअरींग वर्क्स, केडगांव, अहमदनगर या घटकाचा Annexure –E कार्यालयास प्राप्त झाल्याने या विषयावरही प्राथमिक स्वरुपाची चर्चा झाली असता Annexure – E बॅंकेने १५ दिवसांत सादर करावा याबाबत बॅंकेस पत्र देण्याचे ठरले. (कार्यवाही : जिउकें).

मे. एस.बी..पीसीजन स्प्रिंग, मऔविम, अहमदनगर या उद्योग घटकाने वित्तीय संस्था बॅंक ऑफ बडोदा, मओविम, अहमदनगर शाखा याबाबत चर्चा झाली व हयापुर्वीच्या सभांमध्येही सविस्तर चर्चा झाली आहे आणि जिल्हा उद्योग केंद्र पातळीवर दि. ११-०६-०९ रोजीच्या बैठकित चर्चा झाल्याप्रमाणे Revolving Credit Against Basic Order या सदराखाली उद्योग घटकाने बॅंकेस सर्व आवश्यक माहिती उपलब्ध करुन द्यावी असे ठरले होते. यावर बॅंकेचे अधिकारींनी खुलासा केला की, उद्योग घटकाने बॅंकेला लागणारी आवश्यक ती सर्व माहिती अद्याप दिलेली नाही , घटकांस रु.२५/- लक्ष रकमेचे देणी आहे. त्याप्रित्यर्थ घटकांकडे किती रकमेची मालमत्ता आहे याची माहिती उपलब्ध नाही अशा परिस्थितीत कोणत्या आधारे बॅंकेने घटकांस कर्ज उपलब्ध करुन द्यावे . घटकांकडे फारच कमी रकमेच्या पुरवठा ऑर्डर्स आहेत. यावर मा. अध्यक्षांनी बॅंक व घटक यांनी एकत्रित बसुन यातुन मार्ग काढावा व १५ दिवसांचे आंत जिल्हा उद्योग केंद्रास माहिती पुरवावी. तसेच घटकाकडुन पाहिजे असलेली कागदपत्रे घटकाने जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत बॅंकेस उपलब्ध करुन द्यावी की जेणेकरुन कागदपत्रे मिळाली नाहीत अशी बॅंकेची तक्रार रहाणार नाही. **(कार्यवाही : जिउकें)**

शेवटी उपस्थितांचे आभार व्यक्त करुन सदस्य सचिवांनी मा.अध्यक्षांच्या अनुमतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरी/-----------

प्र.महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा आजारी उद्योग पुर्नवसन समिती
जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर

स्वाक्षरी/-----------
अतिरिक्त जिल्हाधिकारी, अहमदनगर.

D:\ahmed-Web\DIC\ZUM _110809.doc

**दिनांक ११/०८/२००९ रोजी मा.अतिरिक्त  जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत्त.**

| अक्र/ विषय क्र. | विषय | विषय सादर करणारी संघटना कार्यालय | कार्य वाहीशी संबंधी त कार्या लय | कार्यवाही / निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे .. | जि.उ.कें.अ.नगर | - | मागील सभेचे इतिवृत्त दि. १४-७-०९ ची प्रत सर्व संबंधीतांना पाठविण्यात आल्याचे नमुद करुन या बाबत कणास काही सूचवायचे असल्यास तसे सभेत नमूद करावे असे स्पष्ट केले असता यावर कुणाचे काही म्हणणे नसल्यामुळे मा. अध्यक्ष यांचे पूर्व परवानगीने सभेचे कामकाज पुढे सुरु करण्यात आले. |
| २ | मे.सनफार्माजवळ वाहने उभि  असलेमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर अहमदनगर | महा नगर पालि का, अहमदनगर | याबाबत मनपा यांनी सर्व संबंधीत नाका चेकर यांना वहातुकीची कोंडी होणार नाही अशा सूचना दि. १५-७-०९ च्या पत्रान्वये दिलेल्या असून मऔविमं (कामे) यांनी त्यांचेकडील ७-८-०९ चे पत्रान्वये कळविल्या नुसार अतिक्रमणे काढण्यात आली असून पुनश्च अतिक्रमण झाल्यास त्वरीत काढण्याची कार्यवाही केली जाईल असे कळविल्याप्रमाणे सभेत चर्चा होऊन संबंधीत विषय सूचिवरुन कमी होणेस हरकत नसावी असे ठरले. ( **कार्यवाही - मऔविम)** |
| २ | महा.नॉनबायोडिग्रेडिबल गार्बेज नियंत्रण अध्यादेश २००६ व क्ष्याअंतर्गत महा. प्लास्टीं कपिशव्यांचे (कॅरीबॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम २००६ व महा. अविघटनशिल धनकचरा नियम  २००६ बाबत | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर | मऔ विम | मऔविमं यांनी स्पेस क्र.२५ चा काही भाग कचरा टाकणेसाठी तातपुरता देणे बाबतचा प्रस्ताव प्रादेशिक अधिकारी, पुणे याच्या कडे  दि. ३१-७-०९ अन्वये सादर केला असल्याचे कळविले आहे. असे असले तरी कायमस्वरुपी कचरा टाकण्यासाठी महामंडळाने उद्योजकांना जागा उपलब्ध करुन द्यावी या करीता योग्य तो पाठपुरावा करावा असे मा. अध्यक्षांनी सभेत सूचना केल्या .**(कार्यवाही : क्षेत्रीय** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **व्यवस्थापक, मऔविम )** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्रीरामपूर मऔविमं क्षेत्रासाठी मोठया प्रमाणावर कायम स्वरुपी पाणी पुरवठयाची सोय होणे बाबत. | श्रीरामपूर एम आय डी सी असोशिएशन | मऔ विमं | उपअभियंता, बांधकामे मऔविमं यांनी सभेत सांगीतले की श्रीरामपूर मऔविमं तील कायमस्वरुपी पाणी पुरवठा सोय करणे बाबत टेंडर फायनल करण्यात आले असून काम लवकर सुरु करण्यात येईल. तरी याबाबतची सविस्तर माहिती मऔविमं कामे यांनी पुढील सभेत द्यावी असे चर्चेअंती ठरले. **(कार्यवाही : उपअभियंता, मऔविम, कामे.)** |
| ४ | १. मऔविमं क्षेत्रासाठी अतिरिक्त जमीन संपादन | मराठा चेंबर | मऔविमं | सदर विषयाबाबत मा. अध्यक्षांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावा बाबत अद्ययावत स्थितीचा पाठपुरावा करुन अद्यावत स्थितीचा पुढील सभेस माहिती सादर करण्यात यावी असे चर्चेत ठरले. तसेच नविन पाथर्डीरोड व भाळवणी परिसरातील अतिरिक्त क्षेत्रा बाबत प्रस्ताव सादर करावा. **(कार्यवाही : उपअभियंता, मऔविम, कामे.)** |
| ५ | फुडपार्क मधील प्लॉट व प्रगती | मराठा चेंबर | मऔविमं | फुडपार्क मधील भूखंडांचे वाटप हे प्रादेशिक अधिकारी, पुणे कडुन करण्यात येत आहे. तरी याबाबतचा सद्यपरिस्थितीचा अहवाल क्षेत्र व्यवस्थापक यांनी प्रादेशिक अधिकारी, पुणे कडुन प्राप्त करुन घेऊन सविस्तर माहिती द्यावी. **(कार्यवाही : क्षेत्रव्यवस्थापक, म औ वि मं)** |
| ६ | मराविविकं यांनी मासिक बैठका लावणे बाबत | मराठा चेंबर | मरावि विकं | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी मासिक बैठक घेतल्याची माहिती कळविलेली नाही असा मुद्दा सभेत उपस्थित झाला असता सदरची सभा घेण्यात आल्याचे मराविविकं अधिकारी यांनी सभेत सांगीतले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन येथुन पुढे दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी सभा आयोजित करण्यात यावी व सर्व संबंधीत औद्योगिक संघटना व जिल्हा उद्योग केंद्रास आमंत्रित करण्यात यावे व सभेमध्ये औद्योगिक संघटनांचे मुद्दे सोडवावे असे सर्वानुमते ठरले. तसेच मागील सभेचे इतिवृत्त सर्व संबंधीतांना पाठविण्याचे ठरले. **(कार्यवाही : मराविविकं)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | ३.१ भाळवणी येथील उद्योजकांना सुरळीत वीज पुरवठा होणे बाबत | अस्मिता, अ.नगर | मरावि विकं. | सदरचा प्रश्न सोडविण्यात आल्याची माहिती मराविविकं चे अधिकारी यांनी सभेत दिली. अस्मिता या औद्योगिक संघटनेने मंडळाचे पत्राव्दारे आभार व्यक्त केले आहे. त्यामुळे सदर विषय सूचिवरुन कमी करण्यात यावा. |
| ८ | एमआयडीसीअंतर्गत लघु उदयोग घटकांना एल टी ग्राहका करीता दंड(पेनल्टी ) आकारण्याबाबत | अस्मिता अहमदनगर | म_रा वि वि कं | सदरचा विषय दरमहा घेण्यात येणा-या पहिल्या मंगळवारच्या सभेत घेण्यात येऊन तो निकाली काढावा व या बाबतची माहिती पुढील सभेत मराविविकं चे अधिकारींनी द्यावी असे मा. अध्यक्षांनी सूचविले. **(कार्यवाही मराविविकंलि)** |
| ९ | क्लस्टरसाठी भूखंड मिळणे | मराठा चेंबरं | मऔविमं | सभेत माहिती दिल्यानुसार क्षेत्रव्यवस्थापक, यांनी मा. प्रादेशिक अधिकारी, मऔविमं पुणे यांचेशी संपर्क साधुन निश्चित स्वरुपाची याबाबतची माहिती पुढील सभेस सादर करावी. **(कार्यवाही : क्षेत्रव्यवस्थापक, मऔविमं,)** |
| १० | कामगारांना वाहुन नेणा-या मिनी डोअर वाहनासाठी विनंती थांब्यांची जागा निश्चित होणे. | मराठा चेंबर | मनपा | सदरच्या विषयाबाबत चर्चा झाली असता मनपा अधिकारी उपस्थित नव्हते त्यामुळे वाहन उभि रहाण्याकरीता जागे संबंधी निश्चित निर्णय होऊ शकला नाही. श्री घैसास, अस्मिता यांनी सूचविले की याबाबत मिनी डोअर वाहन संघटनेचे अध्यक्ष यांचेशी मनपा यांनी चर्चा करावी व पुढील सभेत याबाबत माहिती सादर करावी. **(कार्यवाही : मनपा )** |
| ११ | सुपा मऔविमं च्या रस्तेच्या कडेला झालेल्या अतिक्रमाणा बाबत | श्री सुनिल बबन थोरात, प्लॉट नं. एक्स-१ सुपा मऔविमं | मऔविमं | याबाबत मऔविमं यांनी नोंद घ्यावी तसेच अर्जदार श्री सुनिल थोरात, सुपा यांनी याबाबत पोलीस खात्याकडे तक्रार करावी व तसे श्री थोरात यांना कळवावे असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. **(कार्यवाही : जिउकें, उपअभियंता, मऔविमं.कामे)** |
| १२ | श्रीरामपूर मऔविमं मध्ये व्यावसायीक व उद्योगांकरीता आरक्षीत केलेल्या प्लॉट मध्ये आदलाबदल करुनये व कर्मशियल प्लॉटचे इंड.प्लॉटमध्ये हस्तांतर करुनये | श्रीरामपूर औद्यो.वसा. लि. | मऔविमं | याबाबतच्या अर्जाची प्रत जिउकें स प्राप्त झाली असून क्षेत्रव्यवस्थापक, मऔविमं यांनी याची नोंद घ्यावी व अध्यक्ष, श्रीरामपूर लघु उद्योग संघटना यांनी वरीष्ठ पातळीवर याबाबत पत्रव्यवहार करुन त्याचा पाठपुरावा करावा. विषय सूचिवरुन कमी करण्यात यावा. **(कार्यवाही : श्रीरामपूर लघु उद्योग संघटना, श्रीरामपूर व मऔविमं.)** |

स्वाक्षरी/-----------
प्र. महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा स्थानिक लोकांना रोजगार समिती
जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर

स्वाक्षरी/-----------
मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा स्थानिक लोकांना रोजगार समिती
अहमदनगर

D:\ahmed-Web\DIC\ZUM _110809.doc